
23 APR 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





कोल्हापूर : राष्ट्रीय स्तरावरील स्टोरीमॅप स्पर्धेमध्ये डॉ. अभिजित पाटील यांनी मांडलेल्या बांदिवडेतील दुर्मिळ बहुभूज स्तंभ, दुसऱ्या छायाचित्रात स्टोरीमॅप स्पर्धेचे विजेतेपद मिळविणाऱ्या डॉ. अभिजित पाटील यांचे ग्रंथ भेट देऊन अभिनंदन करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत डॉ. सचिन पन्हाळकर.

# बांदिवडेतील दुर्मिळ बहुभूज स्तंभाची जगाला भुरळ

## अभिजित पाटील यांचा प्रकल्प; 'एस्री-इंडिया'च्या स्टोरी-मॅप स्पर्धेत यश

कोल्हापूर, ता. २२ : राष्ट्रीय स्तरावरील स्टोरी-मॅप स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागातील अध्यापक डॉ. अभिजित पाटील यांनी विजेतेपद प्राप्त केले. त्यांनी 'हिडन जेम्स ऑफ बांदिवडे : द जिऑलॉजिकल ट्रेझर' या विषयावरील प्रकल्प सादर केला. त्यामध्ये त्यांनी मांडलेल्या बांदिवडेतील दुर्मिळ बहुभूज स्तंभ, निसर्गरम्य भूगर्भीय चमत्कारांनी जगभरातील प्रेक्षकांना भुरळ घातली.

जीआईएस (भौगोलिक माहिती प्रणाली) या क्षेत्रातील जगातील सर्वांत मोठी संस्था असलेल्या एस्री-इंडिया ( इन्व्हायरमेंटल सिस्टीम रिचर्स इन्स्टिट्यूट) या संस्थेतर्फे गेल्या तीन वर्षांपासून राष्ट्रीय स्तरावर स्टोरी-मॅप स्पर्धा घेतली जाते. यापूर्वी सन २०२१ आणि २०२२ या वर्षीच्या स्पर्धेमध्ये अनुक्रमे आयआयटी गुवाहाटी येथील स्पर्धकाच्या 'ब्रह्मपुत्रेचा पूर' आणि आयआयटी खरगपूर येथील स्पर्धकाच्या 'पर्वतांचे भूत' या स्पर्धकांनी पटकावले आहे. या स्पर्धेसाठी गेल्या वर्षी डॉ. पाटील यांनी 'हिडन जेम्स ऑफ बांदिवडे : द जिऑलॉजिकल ट्रेझर' या विषयावरील प्रकल्प सादरीकरण केले. या सादरीकरणाने केवळ प्रेक्षकांनाच भुरळ घातली नाही तर बांदिवडेच्या निर्मनुष्य, निसर्गरम्य भूगर्भीय चमत्कारांच्या अंतर्दृष्टीपूर्ण शोधासाठी व्यापक प्रशंसाही मिळविली. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी डॉ. पाटील यांचे ग्रंथ भेट देऊन अभिनंदन केले. यावेळी डॉ. सचिन पन्हाळकर उपस्थित होते.

### वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प

■ या स्पर्धेसाठी डॉ. पाटील यांनी निवडलेला विषय हा कोल्हापूर जिल्ह्यातील मसाई पठरालगत असणाऱ्या बांदिवडे (ता. पन्हाळा) या गावातील अग्निस्तंभांवर आधारित आहे. भारतातील सर्वांत दुर्मिळ बहुभूज स्तंभ, बेसाल्ट संरचना पाहावयास मिळते. याची निर्मिती ६५.६ दशलक्ष वर्षांपूर्वी झाली असावी. काही स्तंभांची उंची ४० मीटरपेक्षा जास्त आहे. जगामध्ये अशा संरचना खूपच कमी पाहायला मिळतात. असे असूनदेखील या संरचनेची शास्त्रीय व पर्यटन दृष्टिकोनातून महत्त्व व माहिती खूप कमी लोकांना आहे. त्यामुळेच डॉ. पाटील यांनी स्टोरी-मॅप स्पर्धेसाठी याठिकाणाची निवड केली. यासाठी त्यांनी या संपूर्ण परिसराचे ड्रोनद्वारे त्रिमितीय सर्वेक्षण केले. या परिसराचे भूगर्भीय, पर्यटन व शैक्षणिक महत्त्व या स्पर्धेसाठीच्या मांडणीतून अधोरेखित केले.

23 APR 2024
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्टोरीमॅप स्पर्धेत डॉ. अभिजित पाटील विजेते

## 'हिडन जेम्स ऑफ बांदिवडे : द जिऑलॉजिकल ट्रेजर' विषयावरील प्रकल्पाचे केले होते सादरीकरण

कोल्हापूर : राष्ट्रीय स्तरावरील स्टोरीमॅप स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागातील अध्यापक डॉ. अभिजित पाटील यांनी विजेतेपद प्राप्त केले आहे. 'हिडन जेम्स ऑफ बांदिवडे : द जिऑलॉजिकल ट्रेजर' या विषयावरील प्रकल्प त्यांनी सादर केला.



डॉ. अभिजित पाटील यांचे अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के.

जीआई एस (भौगोलिक माहिती प्रणाली) या क्षेत्रातील जगातील सर्वात मोठी संस्था असलेल्या एस्त्री-इंडिया या संस्थेमार्फत गेल्या तीन वर्षांपासून राष्ट्रीय स्तरावर स्टोरी-मॅप स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. यापूर्वी सन २०२१ व २०२२ या वर्षीच्या स्पर्धेमध्ये अनुक्रमे आयआयटी गुवाहाटी येथील स्पर्धकाच्या 'ब्रह्मपुत्रेचा पूर' आणि आयआयटी खरगपूर येथील स्पर्धकाच्या 'पर्वतांचे भूत' या स्पर्धकांनी पटकावले आहे. या स्पर्धेसाठी गतवर्षी (२०२३) डॉ. पाटील यांनी 'हिडन जेम्स ऑफ बांदिवडे : द जिऑलॉजिकल ट्रेजर' या विषयावरील प्रकल्प सादरीकरण केले. त्यांना स्पर्धेमध्ये सर्वोत्कृष्ट ठरवण्यात येऊन विजेता घोषित करण्यात आले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी डॉ. अभिजित पाटील यांचे ग्रंथ भेट देऊन अभिनंदन केले. यावेळी डॉ. सचिन पन्हाळकर उपस्थित होते.

### बांदिवडे गावासंदर्भातील वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प

हा प्रकल्प मसाई पठरालगत असणाऱ्या बांदिवडे (ता. पन्हाळा) या गावातील अग्नी स्तंभांवर आधारित आहे. भारतातील सर्वात दुर्मीळ बहुभूज स्तंभ, बेसाल्ट संरचना या ठिकाणी पाहावयास मिळते. याची निर्मिती ६५.६ दशलक्ष वर्षांपूर्वी झाली असावी, येथील काही स्तंभांची उंची ४० मीटरपेक्षा जास्त आहे. जगामध्ये अशा संरचना खूपच कमी पाहायला मिळतात.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 APR 2024
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठासमोर भुयारी मार्गाचे काम सुरू असून, त्यासाठी खंदक खोदून काँक्रीट टाकण्यात आले आहे. (छाया : अर्जुन टाकळकर)

# शिवाजी विद्यापीठासमोरील भुयारी मार्गाचे काम सुरू

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरूपी जोडणाऱ्या भुयारी मार्गाच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. सध्या हे काम गतीने सुरू आहे. विद्यापीठासमोरील रस्त्याच्या पूर्वेकडील बाजूस मोठा खंदक खोदण्यात आला आहे. पूर्व पश्चिम जोडणारा हा भुयारी मार्ग १० फूट खोल, सुमारे ९ फूट रुंद आणि १०० फूट लांबीचा होणार आहे.

भुयारी मार्गासह सर्व्हिस रस्ता बांधण्यासाठी ८ कोटी ४८ लाख ८१ हजारांचा निधी प्राप्त झाला आहे. या निधीतून सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे काम सुरू करण्यात आले आहे. भुयारी मार्गामुळे या परिसरातील अपघातांना आळा बसणार आहे. या भुयारी मार्गातून दुचाकी, चारचाकीसह हलक्या वाहनांना प्रवास करता येणार आहे.

शिवाजी विद्यापीठाचा विस्तीर्ण परिसर जुन्या पुणे-बेंगलोर महामार्गामुळे पूर्व-पश्चिम विभागला आहे. पश्चिम भागात मुख्य प्रशासकीय इमारतीसह विविध अधिविभाग, क्रीडा संकुल आहे. पूर्व भागात विद्यापीठाचा माहिती-तंत्रज्ञान अधिविभाग, स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, शाहू

- अपघातांना बसणार आळा
- विद्यार्थ्यांसह नागरिकांची सोय
- साडेआठ कोटींचा निधी

रिसर्च सेंटर, शिक्षणशास्त्र अधिविभाग आहेत; तर यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट, जर्नालिझम व मास कम्युनिकेशन सेंटर, कन्हेंशन सेंटर इमारतींचे बांधकाम सुरू आहे. त्यामुळे दोन्ही विभागांना जोडणारा भुयारी मार्ग सर्वांसाठी सुकर होणार आहे.

या रस्त्यावरून विद्यापीठातील विद्यार्थी, पालक, शिक्षक अशा सुमारे २ ते ३ हजार नागरिकांची दररोज ये-जा सुरू असते. या रस्त्यावर पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावरून शहरात येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ सुरू असते. या ठिकाणी अनेकदा लहान-मोठे अपघातांचे प्रकारही घडले आहेत. त्यामुळे विद्यापीठाने भुयारी मार्ग व सर्व्हिस रस्त्यासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 APR 2024
सकाळ

# महावीर महाविद्यालयात ग्रंथ प्रकाशन सोहळा

कोल्हापूर, ता. ता. २२ : 'तरुणवर्ग ललित वाङ्मयाकडे कसा पाहतो, त्यावर कसा विचार करतो, हे दिनेश काळे यांचे कथात्मक साहित्य या ग्रंथातून स्पष्ट होते. तरुण पिढीतील संशोधक दिनेश काळे यांच्या साहित्याकडे कोणत्या दृष्टीने पाहतात, त्यांचा परिचय कसा करून देतात याचा एक चांगला पट या ग्रंथातून पुढे येतो,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले.

महावीर महाविद्यालयात डॉ. बाळासाहेब सुतार आणि डॉ. प्रियदर्शनी देशमुख लिखित 'दिनेश काळे यांचे कथनात्मक साहित्य' पुस्तक प्रकाशनावेळी ते बोलत होते.

डॉ. शिंदे म्हणाले, ''समीक्षा ही संक्षिप्त असावी. युरोपमध्ये अनेक ज्ञानशाखांची सरमिसळ होत असताना मराठीतील समीक्षा विश्व मात्र संकुचित होताना दिसते आहे. या पार्श्वभूमीवर नव्या विचाराची समीक्षा या ग्रंथात दिसते.'' महावीर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे यांनी, या ग्रंथातून दिनेश काळे यांच्या वैविध्यपूर्ण लेखनातील सामर्थस्थळे दाखवून दिली आहेत. इंग्रजी साहित्यात शेक्सपियरने ज्याप्रमाणे ३६ ग्रंथांची निर्मिती केली त्याचप्रमाणे दिनेश काळे यांनीही३६ ग्रंथ निर्मिती करून मराठी साहित्य विश्वामध्ये ओळख निर्माण केली आहे. नव्या लिहित्या हातांना बरोबर घेऊन संपादित ग्रंथाची निर्मिती उत्कृष्ट झाली आहे, असे सांगितले. मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. गोपाळ गावडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी परिचय दिला. डॉ. शरद गायकवाड यांनी आभार मानले. डॉ. रमेश खबाले यांनी सूत्रसंचालन केले.



कोल्हापूर : महावीर महाविद्यालयात ग्रंथ प्रकाशन सोहळ्याप्रसंगी उपस्थित मान्यवर.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 APR 2024
सकाळ

# 'नॅनोसायन्स'च्या दोन विद्यार्थ्यांची परदेशातील पीएच.डी.साठी निवड

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी या अधिविभागातील रचना पोतदार, विनय पाटील या विद्यार्थ्यांची दक्षिण कोरिया आणि फिनलंड येथील विद्यापीठांमध्ये पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. ते दोघेही कोल्हापूरचे आहेत.

फिनलंडमधील युनिव्हर्सिटी ऑफ उलू, लूक हेलसिंकीमध्ये रचना पोतदार हिची पीएच.डी.साठी उच्च विद्यावेतनासहित निवड झाली आहे. ती 'बायोबेस्ड अँटी-व्हायरल्स' या विषयावर सन २०२४-२८ या कालावधीत काम करणार आहे. संशोधनासाठी तिला दरमहा दोन हजार युरो म्हणजेच एक लाख ७८ हजार रुपये विद्यावेतन मिळणार आहे. दक्षिण कोरियामधील क्यूंग या युनिव्हर्सिटीमध्ये विनय पाटील याची



रचना पोतदार



विनय पाटील

इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग डिपार्टमेंटमध्ये पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी उच्च विद्यावेतनासहित निवड झाली आहे. तो 'ऑर्गेनिक ऑप्टोइलेक्ट्रॉनिक्स' या विषयावर काम करणार आहे. त्याला संशोधनासाठी दरमहा १.५ मिलिऑन कोरियन वोन म्हणजेच ९५ हजार रुपये विद्यावेतन मिळणार आहे. या दोन्ही विद्यार्थ्यांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा आदींचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 APR 2024
तरुण भारत

# अध्यासनातून साकारलेय... महर्षी विठ्ठल रामजी शिंदेंचे स्मारक

- महर्षी वि. रा. शिंदेंच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा संशोधकांकडून अभ्यास
- ज्येष्ठ नेते स्व. डॉ. एन. डी. पाटील प्रतिष्ठानचा अध्यासनासाठी पुढाकार

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात तत्कालीन कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या दूरदृष्टीमुळे २००८-०९ मध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन स्थापन झाले. अध्यासन प्रमुखपदी प्रा. विश्वनाथ शिंदे यांची नियुक्ती झाली. या अध्यासनातून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे वैचारिक स्मारक विद्यापीठात उभे राहिले. २००७ पासून २०१६ पर्यंत अध्यासनाचे समन्वयक म्हणून डॉ. शिंदे यांनी काम पाहिले. त्यानंतर डॉ. रणधीर शिंदे समन्वयक झाले. अध्यासनासाठी दिवंगत ज्येष्ठ नेते डॉ. एन. डी. पाटील प्रतिष्ठानने १० लाखांची देणगी दिली. देणगीचे व्याज व विद्यापीठ निधीतून अध्यासनाची वाटचाल सुरू आहे. महर्षी शिंदे यांच्या विचार, कार्याचा प्रसार अन् नव्या पिढीला प्रेरणा हा अध्यासनाचा हेतू आहे.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची मंगळवारी, २३ रोजी शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती. त्यांच्या १५१ व्या जयंतीच्या निमित्ताने विद्यापीठातील महर्षी शिंदे अध्यासनाचे कार्य महत्वपुर्ण आहे. महर्षी शिंदे यांनी सामाजिक, राजकीय, वैचारिक व संशोधनात्मक क्षेत्रात मौलिक कार्य केले आहे. त्यांच्या कार्याच्या अनेकविध पैलूंचा अभ्यास केला जात आहे. एकविसाव्या शतकाच्या वाटचालीत महर्षी शिंदेंच्या विचारांचे द्रष्टेपण पथदर्शक ठरावे, असे आहे. त्यांच्या कार्याविषयीचे संशोधन विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांपर्यंत पोहचवण्याचे कार्य महर्षी विठ्ठल



रामजी शिंदे अध्यासन करत आहे. अध्यासनांतर्गत कार्यशाळा, चर्चासत्रे आणि व्याख्याने घेतली जात आहेत. डॉ. एन. डी. पाटील यांच्या देणगीतून अध्यासनाचे काम सुरू असल्याने आतापर्यंत निधी कमी पडलेला नाही.

**पोस्टाकडून महर्षी शिंदेंच्या कार्याचा गौरव**

महाराष्ट्राच्या जडणघडणीत महर्षी विठ्ठल रामजी शिंदेंचे महत्वाचे



योगदान आहे. त्यामुळे महर्षी शिंदेंच्या १५० जयंतीनिमित्त टपाल विभागाने त्यांची प्रतिमा असलेले टपाल तिकीट काढून त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला. या टपाल तिकिटाचे अनावरण गतवर्षी शिवाजी विद्यापीठातच झाले.

**प्रा. गो. मा. पवारांच्यामुळेच महर्षी विठ्ठल रामजी शिंदेंचे कार्य प्रकाशात**

प्रा. गो. मा. पवार यांनी 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे जीवन व कार्य' यावर सखोल अभ्यास करून मराठीत ग्रंथ लिहीला आहे. त्याचा अनुवाद हिंदी, इंग्रजीत केला आहे. त्यामुळेच महर्षी शिंदेंचे कार्य सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्यास मदत झाली आहे. साहित्य अकादमीनेही महर्षी शिंदेंच्या जीवन कार्यावरील पुस्तकाचे प्रकाशन केले आहे. पवार यांच्यामुळेच मर्षी शिंदेंचे शेती, अस्पृश्यता, सामाजिक प्रश्नांवरचे कार्य समाजासमोर आले. त्यांच्या नावाने असलेल्या अध्यासनातून त्यांचे विचार पोहोचवले जात आहेत.

**अध्यासनातून महर्षी शिंदेंच्या कार्याचा प्रसार**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन विद्यापीठात २००७ पासून सक्रिय आहे. मुख्यत्वे महर्षी शिंदेंच्या जीवनकार्यावर चर्चा व्हावी, या दृष्टीने अध्यासन कार्यरत आहे. आजवर अनेक महत्त्वाच्या विषयांवर राष्ट्रीय परिसंवाद, कार्यशाळा, व्याख्याने व ग्रंथ प्रकाशनाचे काम अध्यासनाने केले आहे. सामाजिक, संशोधनात्मक प्रबोधनाचे काम अध्यासन करत आहे.

– डॉ. रणधीर शिंदे
(समन्वयक, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 APR 2024
पुढारी

# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जयंतीनिमित्त आज चर्चासत्राचे आयोजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे मंगळवारी (दि. २३) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जयंतीनिमित्त चर्चासत्राचे आयोजन केले आहे. डॉ. विजया पाटीललिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे ललित लेखन' या ग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांच्या हस्ते होणार आहे. प्राचार्य टी. एस. पाटील मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

23 APR 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेला ६ हजार ३४९ विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षेला सोमवारी ६ हजार ३४९ विद्यार्थी बसले. त्यापैकी ६०० विद्यार्थी गैरहजर होते. सोमवारी मास्टर ऑफ सायन्स, आर्टस्, बॅचलर ऑफ एज्युकेशन, मास्टर ऑफ कॉमर्स, बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, बॅचलर ऑफ लायब्ररी ॲंड इन्फॉर्मेशन, मास्टर ऑफ सोशल वर्क, बी.एस्सी., एम.एस्सी. नॅनो सायन्स, मास्टर ऑफ जर्नालिझम आदी २२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा पार पडल्या. मास कम्युनिकेशन, एम.ए. (भाषा प्राद्योगिकी), योगाशास्त्र, बी.कॉम. (बॅंक मॅनेजमेंट), बी.कॉम. (आयटी), बी.व्होक. (ग्राफिक्स डिझाईन), कॉम्प्युटर सायन्स, बॅचलर ऑफ इंटेरिअर डिझाईन आदी १८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 APR 2024
तरुण भारत

# बीएस्सी बीएड एंट्रन्सचा अर्ज भरण्यासाठी ३० पर्यंत मुदत

कोल्हापूर : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभाग बी. एस्सी. बीएड हा एकात्मिक चार वर्षांचा अभ्यासक्रम आहे. हा चार वर्षांचा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सुरू होत आहे. बारावी विज्ञान शाखा उत्तीर्ण किंवा ज्यांनी बारावी विज्ञान शाखेची आत्ताच परीक्षा दिलेली आहे, असे विद्यार्थी राष्ट्रीय परीक्षा एजन्सी यांच्याद्वारे घेण्यात येणाऱ्या नॅशनल कॉमन एंट्रन्स टेस्ट (च्ऊं) देऊन या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतात. या प्रवेश परीक्षेचा अर्ज भरण्यासाठी ३० एप्रिलपर्यंत मुदत देण्यात आली आहे. तरी या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमाच्या समन्वयक डॉ. रुपाली संकपाळ व कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 APR 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या ९९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा दि. २१ मार्चपासून सुरू आहेत. त्याचबरोबर विविध अभ्यासक्रमांचे निकालही विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून प्रसिद्ध केले जात आहेत. सोमवारी एकूण १८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले, तर सोमवारअखेर ९९ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केले. सोमवारी झालेल्या परीक्षांसाठी ६ हजार ३४९ विद्यार्थ्यांपैकी ६०० विद्यार्थी अनुपस्थित होते. विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. या पथकाकडून सातारा जिल्ह्यातून २ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली, तर सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद झालेली नाही.

जनसंपर्क कक्ष
23 APR 2024 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या पाच जणांची रग्बी विश्वचषक स्पर्धेसाठी निवड

■ सकाळ वृत्तसेवा




वैष्णवी पाटील

कोल्हापूर, ता. २२ : फ्रान्स येथे जूनमध्ये जागतिक विद्यापीठ रग्बी विश्वचषक स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेसाठी भारतीय संघात शिवाजी विद्यापीठाच्या कल्याणी पाटील, वैष्णवी पाटील, साक्षी कुंभार, आकांक्षा कातकडे, हार्दिक राजेभोसले यांची निवड झाली.


एफआयएसयू विश्व विद्यापीठ रग्बी सेव्हन चॅम्पियनशिप स्पर्धा



हार्दिक राजेभोसले



साक्षी कुंभार



कल्याणी पाटील



आकांक्षा कातकाडे

१० ते १२ जून २०२४ या कालावधीत फ्रान्स येथे होत आहे. स्पर्धेसाठी भारतीय संघाची निवड चाचणी १८ ते २२ एप्रिल दरम्यान केआयआयटी-भुवनेश्वर येथे पार पडली. या निवड चाचणीतून न्यू कॉलेजच्या कल्याणी पाटील, वैष्णवी पाटील, साक्षी कुंभार या तिघींची, तर सातारच्या एलबीएस कॉलेजच्या आकांक्षा कातकाडे व मुलांमध्ये सातारच्याच हार्दिक राजेभोसले याची निवड झाली.

या पाच जणांना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, क्रीडा अधिविभाग संचालक डॉ. शरद बनसोडे, दीपक पाटील, प्रा. अमर सासने, संग्राम मोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 APR 2024

तरुण भारत

# विद्यापीठ अंतर्गत ९९ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल-२०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु आहेत. सोमवारी ९९ अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर झाले. कमीत कमी वेळेत निकाल जाहीर करून विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाचा मार्ग रिकामा केला आहे. सोमवारी झालेल्या २२ विषयांच्या परीक्षेला ६ हजार ३४९ पैकी ५ हजार ७४९ विद्यार्थी उपस्थित होते. तर ६०० विद्यार्थी अनुपस्थित होते. भरारी पथकाकडून साताऱ्यात २ कॉपीच्या प्रकारांची नोंद केली आहे. परीक्षा प्रमाद समितीसमोर सुनावणी होऊन गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कारवाई केली जाणार आहे. तरी विद्यार्थ्यांनी नियमांच्या अधीन राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.